

महाराष्ट्र शासन
वन विभाग

माकड/वानर-मानव संघर्ष स्थिती हाताळण्याची प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती





वानर
Langur



माकड
Monkey

सुधीर मुनगंटीवार
मंत्री, वित्त आणि नियोजन, वने
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई



शुभेच्छा संदेश

आपला देश कृषिप्रधान असल्याने निसर्गसंपदशी मानवी जीवनाची नाळ जोडलेली आहे. वनस्पतीसृष्टी आणि लहान मोठे वन्यप्राणी या निसर्गसृष्टीचे महत्वाचे घटक आहेत. वृक्षवल्ली आम्हा सोयरी, वनचरे अशी आपल्या परंपरेची शिकवण आहे. पौरणिक साहित्यातही वने आणि वन्यप्राणी यांचे महत्व जागोजागी अधोरेखित होत असते इतके मानवी जीवन त्यांचेशी समरस झालेले आहे. इतकी दाट लोकसंख्या असूनही सर्वसाधारण भारतीयांच्या मनात निसर्गाविषयी जिव्हाळा असल्यामुळेच भारतात जैविक विविधता, वने आणि वन्यप्राणी संरक्षण संवर्धनाची स्थिती आजही उल्लेखनीय आहे.

वन्यप्राणी सृष्टीतील माकड आणि वानर यांना इतर वन्यप्राण्यांपेक्षा मानवाचे अधिक सान्निध्य लाभत आले आहे. म्हणूनच माकडे आणि वानरे जंगलांसोबतच मानवी वस्तीतूनही सहजपणे वास्तव्य करित असतात. याशिवाय धार्मिक भावनेमुळे त्यांच्याप्रती आत्मियता दिसून येत असते. नैसर्गिक स्वाभाविकपणे जोपर्यंत हे सहजीवन होत राहील तोपर्यंत कोणतीच समस्या उदभवत नाही. परंतु नैसर्गिक कारणास्तव किंवा मानवी चुकांमुळे कधी कधी एखाद दुसरे माकड किंवा वानर उपद्रवी ठरु शकते. अशा वेळी कोणती कार्यवाही करावी याबद्दल क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना कोणताही संभ्रम राहू नये. त्यांना मार्गदर्शन मिळावे यासाठी वन विभागातर्फे सदर पुस्तिका तयार करण्यात आली आहे. या पुस्तिकेच्या आधारे माकड/ वानर आणि मानव यांच्यातील तणावाचे प्रसंग अधिक विचारपुर्वक, अचूकतेने हाताळले जातील आणि माकड / वानर तथा मानव यांना निकोप सहजीवन पूर्ववत सुरु ठेवण्यास मदत मिळेल असा मला विश्वास वाटतो.

विकास खारगे
सचिव (वने)
महसूल व वन विभाग,
महाराष्ट्र शासन, मुंबई



शुभेच्छा संदेश

महाराष्ट्र राज्य अत्यंत प्रगत राज्य गणले जाते. भौगोलिक, सामाजिक, नैसर्गिक आणि सांस्कृतीक विविधतेने नटलेल्या या राज्यात महत्वाच्या वन्यजीवांचाही आढळ आहे. ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. गेल्या काही वर्षातील वने आणि वन्यजीव संवर्धनाच्या दिशेने केलेल्या प्रयत्नांमुळे म्हणून महाराष्ट्रात वन्यजीव संवर्धनाबाबत आशादायी आणि उत्साहवर्धक परिणाम दिसून येत आहे. तथापि त्याचबरोबर, वाढती मानवी लोकसंख्या वाढते औद्योगिकीकरण यामुळे वन्य प्राण्यांचा अधिवास सुरक्षित राखणे, त्यांच्यात सातत्य राखणे या बाबी अधिकाधिक आव्हानात्मक होत आहेत. वनेतर जमीन वापर पध्दतीत बदल होत आहेत. या सर्वांचा परिणाम म्हणून वन्यजीव आणि वन्यजीवांचा अधिवास संतुलित राखणे जिकिरीचे होत चालले आहे. वन्यप्राणी त्यांच्या नैसर्गिक स्वभावधर्मानुसार वागत असल्याने अधूनमधून वन्यप्राणी मानव संघर्षाची स्थिती उदभवते. ही स्थिती नेमकेपणाने हाताळण्यासाठी सर्वांना उपयोगी व्हावी म्हणून मार्गदर्शक सूचना आवश्यक ठरतात.

महाराष्ट्र वन विभागाने या दृष्टीने काही प्रमुख वन्यप्राण्यांच्या बाबतीत अशा मार्गदर्शक पुस्तिका तयार केलेल्या आहेत. प्रस्तुत पुस्तिका त्याच मालिकेतील असून माकड / वानर आणि मानव यांच्यातील संघर्षाची स्थिती हाताळण्यासाठी सर्व संबंधितांनी याचा उपयोग करावा असे माझे आवाहन आहे.

ए. के. सक्सेना
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख)
महाराष्ट्र राज्य, नागपूर




संदेश

वन्यप्राणी आणि मानव यांमधील संघर्षाचे प्रसंग राज्यात अधूनमधून उदभवतात असे दिसून येते. अशा प्रसंगाना पध्दतशीरपणे कसे सामोरे जावे यासाठीच्या प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दतीची मालिका वन विभागातर्फे प्रकाशित करण्यात येत आहे. ही उल्लेखनीय बाब आहे. कर्मचाऱ्यांना, विशेषतः नव्याने भरती होणाऱ्यांना यांचा अत्यंत उपयोग होईल. त्याप्रमाणे इतरजणांनाही या समस्यांची व्याप्ती जाणून घेता येईल आणि ह्या समस्या सोडविताना वन विभागाला कोणत्या दिव्यातून पार पडावे लागते याची जाणीव होईल. त्याचसोबतच, माकड-वानरांबाबतच्या समस्या भविष्यात उद्भवू नयेत यासाठी घ्यावयाच्या खबरदारीबद्दलही सर्वांना माहिती मिळेल असा माझा दृढविश्वास आहे.

वन विभागाच्या ज्या चमूने ही मार्गदर्शक पुस्तिका आकारास आणली त्यांच्या प्रयत्नांचे मी कौतुक करतो.



सर्जन भगत
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
महाराष्ट्र राज्य, नागपूर



मनोगत

आपल्या पारंपारिक शिकवणीनुसार वन्यप्राणी हे मानवाचे सोयरे आहेत, एकाच कुटुंबाचे घटक आहेत. यात शंका नसली तरी एखाद्या कुटुंबात काही कारणास्तव ज्याप्रमाणे लहान-सहान विवाद उत्पन्न व्हावे त्याप्रमाणे मानवात आणि सोयरे वन्यप्राण्यांत वेळप्रसंगी तणावाची परिस्थिती उद्भवते. अशा घटना अत्यंत शांतपणे व सामंजस्याने हाताळण्यात वनकर्मचारी सहसा यशस्वी होतात ही समाधानाची बाब आहे. त्यात त्यांच्या अनुभवातून आलेल्या ज्ञानाचा वाटा अधिक असतो. जर त्यांस लेखी स्वरुपातील कार्यपध्दतीची जोड मिळाली तर असे प्रसंग अधिक आत्मविश्वासाने हाताळता येतील, शास्त्रिय तत्वांचे पालन होईल, वन्यप्राणी प्रेमींनाही वन विभागाच्या प्रयत्नांविषयी शंका वाटणार नाही.

याच विचारातून महाराष्ट्र वन विभागातर्फे बिबट्या, मगर, अस्वल, गवा आणि माकड / वानर यांच्याबाबतच्या संघर्ष स्थितीतून वाट काढण्यासाठीच्या प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती (एस.ओ.पी.) प्रकाशित करण्यात येत आहेत. माकड / वानर - मानव संघर्ष हाताळण्यासाठीची प्रस्तूत प्रमाणभूत कार्यपध्दती हा त्याच मोहिमेचा भाग आहे. या प्रमाणभूत कार्यपध्दतीबाबत जर जाणकारांच्या काही सूचना असतील तर त्यांचे स्वागत आहे.

कुलदीप ना खवारे
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
नाशिक



प्रस्तावना

महाराष्ट्रातील वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण यामुळे झालेली लोकसंख्या वाढ यामुळे नागरिकांच्या मूलभूत गरजा वाढल्या व असणारी संसाधने कमी पडू लागली. ती पुरी करण्यासाठी शेती क्षेत्रातील जुनी फळझाडे तोड करुन व्यापारी व नगदी पिकांचे क्षेत्रात वाढ झाली. नागरिकांचे जीवनमान वाढले असल्याने राज्यात फळबाग लागवड फार मोठ्या प्रमाणावर झाली आहे. जंगलतोडीमुळे जंगलक्षेत्र व वन्यजीव अधिवास क्षेत्र फार झपाट्याने कमी झाल्याने व जंगलातील रानटी फळझाडे व नैसर्गिक वनराई कमी झाल्याने वानर या प्राण्याने मानवी वस्तीजवळ व मंदीराजवळ स्थलांतर केले आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये वानरास दैवी स्थान दिले असल्याने त्याची कित्येक ठिकाणी पूजा करण्यात येते. या कारणाने वानर ज्यावेळी मानवी अधिवासात येतो त्यावेळी त्याला श्रध्देपोटी अन्न पुरविण्यात येते. वानर हा समुहाने राहात असल्याने त्यांचे जीवन चक्र हे पूर्णपणे वेगळे असून त्याबाबत नागरिकांचे ज्ञान फार कमी आहे. वानराच्या खोडकर प्रवृत्तीमुळे मानवाकडून त्यास नकळत किंवा करमणुकीसाठी डिवचले जाते. बहुतेक वेळा वानराच्या टोळी प्रमुखाला दुसऱ्या सुदृढ नर वानराकडून हल्ल्याद्वारे टोळीतून बाहेर काढले जाते. त्यावेळी सुध्दा त्या वानराकडून मानवावर हल्ला होण्याची शक्यता असते.

वानराकडून वरील कारणांमुळे बऱ्याचदा मानवी अधिवासात हल्ले झाले आहेत. बहुतांशवेळी स्त्रिया घरी एकट्या असताना समस्या निर्माण झाल्या आहेत.

वन विभागाकडून संघर्ष कमी करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतात परंतु त्या पुरेशा ठरत नाहीत व त्यात अनेकदा एकसूत्रताही नसते. बऱ्याच वेळा वन अधिकारी / कर्मचारी यांना लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागले आहे. वानर अतिशय चपळ व बुध्दीवान असल्याने त्यास पकडणे सुध्दा सोपे नसते. या संघर्षावर व समस्येवर सर्व समावेशक उपाययोजना आखण्याची नितांत गरज निर्माण झाली. या गरजेतून ही प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती (Standard Operating Procedure) पुस्तिका स्वरुपात तयार करण्यात आली.

ही पुस्तिका तयार करण्यासाठी तज्ञ क्षेत्रीय अधिकारी, वन्यजीव क्षेत्रात कार्य केलेल्या तज्ञ व्यक्ती, वानर पकडणाऱ्या व्यक्ती यांचेशी सांगोपांग चर्चा करुन तसेच क्षेत्रीय स्तरावरुन माहिती संकलित करुन ही एस.ओ.पी. तयार करण्यात आली आहे व ती सर्व आपल्यासमोर ठेवण्यास अत्यानंद होत आहे. सर्व क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी व नागरिकांना या पुस्तिकेचा उपयोग होईल अशी आशा मी व्यक्त करतो.

अध्यक्ष
माकड/ वानर -मानव संघर्ष स्थिती हाताळण्यास्तव
प्रमाणभूत कार्यपध्दती तयार करण्यासाठीची समिती



अशोक पां. गिऱ्हेपुजे
उपवनसंरक्षक औरंगाबाद वन विभाग,
औरंगाबाद.



ऋणनिर्देश

माकड किंवा वानर आणि मानव यांच्यातील संघर्षाची स्थिती हाताळण्यासाठी सदर प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती सादर करण्यास समितीला आनंद वाटतो. ही संधी दिल्याबद्दल समिती प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) तथा मुख्य वन्यजीव रक्षक, महाराष्ट्र राज्य यांची ऋणी आहे.

या समितीने नाशिक आणि औरंगाबाद येथे एकूण दोन बैठका घेतल्या. सर्व सदस्यांनी मोलाची माहिती दिली, स्वानुभव कथन केले. त्याचप्रमाणे एकत्रित बैठकीत नाशिकच्या बिबट्याविषयक समितीच्या सदस्यांनीही बहुमोल सूचना केल्या. या सर्वांचा उपयोग प्रस्तुत प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती तयार करण्यासाठी झाला आहे. या सर्व सदस्यांचे आभार.

समिती अध्यक्ष यांनी या कार्यपध्दतीत नेमकेपणा आणि अचूकता येण्यासाठी तसेच कार्यपध्दतीला आकार देण्यासाठी सातत्याने मार्गदर्शन केले. याबद्दल समिती त्यांना धन्यवाद देत आहे.

औरंगाबाद वन विभागातील लघुलेखक आणि इतर ज्या ज्या कर्मचारी वर्गाचे यात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष योगदान लाभले आहे त्या सर्वांच्या प्रतीही ऋणनिर्देश व्यक्त करण्यात येत आहेत.

सदस्य सचिव
माकड/ वानर -मानव संघर्ष स्थिती हाताळण्यास्तव
प्रमाणभूत कार्यपध्दती तयार करण्यासाठीची समिती

सूची

अ.क्र.	तपशील	पृष्ठ क्रमांक
१.०	पार्श्वभूमी	१
२.०	माकड / वानर - मानव संघर्षाची कारणे	१
३.०	अभ्यास क्षेत्र	२
४.०	सर्वसाधारण उद्देश	२
५.०	समस्यांचे वर्गीकरण	३
६.०	समस्या हाताळण्याची प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती - ग्रामीण भागात माणसावरील हल्ल्याची	३
७.०	समस्या हाताळण्याची प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती - ग्रामीण भागात खाद्य पदार्थ पळविणे / ओरबाडणे	९
८.०	महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रातील समस्या	९
९.०	परिशिष्टे	११
९.१	आवश्यक मनुष्यबळ, वाहने व तात्पुरता विश्रांतीतळ	११
९.२	आवश्यक पिंजरे व साहित्य	१२
९.३	जाणिव जागृती कामांची रुपरेषा	१६
९.४	केलेल्या कार्यवाहीचा अभिलेख	१७
९.५	वानर/ माकडांस पकडण्याचा अनुभव असलेल्या व्यक्ती	१८
९.६	संघर्षाची परिस्थिती उद्भवणारी वन परिक्षेत्रे	१९
९.७	मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपिठाच्या दि. २२ फेब्रुवारी २०१२ ची निकालाची प्रत	२०
९.८	समितीचे गठण	२२


माकड -वानर-मानव संघर्षाची स्थिती हाताळण्यासाठी कार्यपध्दती :

१.० पार्श्वभूमी :

माकड (Rhesus macaque) शास्त्रीय नांव *Macaca mulata* आणि वानर Common Langur शास्त्रीय नांव *Presbytis entellus* हे वन्यप्राणी



वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ च्या अनुसूची ।। च्या भाग । मध्ये समाविष्ट आहेत. ते जंगलामध्ये तसेच शेतीक्षेत्र, मानवी वस्ती यामध्ये आढळून येतात. वर्षोनुवर्षे सोबत राहत असल्यामुळे माणसांना आणि माकड / वानरांना सहजीवनाची सवय झालेली आहे. पौराणिक साहित्यांमधील उल्लेखांमुळे माकड / वानरांना माणसांपासून अभय मिळाल्याचे चित्र आहे. कितीही त्रास झाला तरी माकड वानरांना मारुन टाकण्याचा विचार लोक करीत नाहीत. या उलट त्यांना कौतुकाने खाऊ घालण्यापासून आनंद मिळवतात असे दृश्य मंदीर परिसरात आणि पर्यटन स्थळांवर दिसते. सहसा माकडे / वानरे मानवाला इजा करीत नाही. परंतु कधी कधी अचानक एखाद दुसरे माकड / वानर आक्रमक बनते, घरात घुसून खाद्य पदार्थ पळवते तेव्हा त्या माकडा/ वानराविरुध्द असंतोषाचे, तणावाचे वातावरण तयार होते. वन विभागाने त्या माकड / वानराचा बंदोबस्त करावा अशी मागणी होते. अशा वेळी करावयाच्या उपाययोजनांसाठी वनकर्मचाऱ्यांना मार्गदर्शन व्हावे या हेतूने प्रस्तुत प्रमाणभूत कार्यपध्दती तयार करण्यात आली आहे.



२.० माकड / वानर - मानव संघर्षाची कारणे :

२.१ वानरांच्या टोळ्यांमधील अंतर्गत संघर्षामुळे किंवा तात्कालीक शारीरिक बदलांमुळे



एखादे नर माकड / वानर काही काळ आक्रमक होऊ शकते.

२.२ माकड वानरांना निसर्गतः पुरेसे खाद्य उपलब्ध न होणे. जंगलातील पाने / फुले / फळे यावर माणसाने कब्जा करणे.

२.३ मानवांनी नागरी वस्तीजवळील माकड/ वानरांना आयते खाण्याची सवय लावणे आणि निसर्गातून खाद्य मिळविण्यासाठीची नैसर्गिक प्रेरणा बिघडवणे. एखादे वेळी आयते खायला मिळाले नाही तर ते माकड / वानर खाद्य हिसकावून घेते.

२.४ माकड-वानराला कोंडीत पकडून इजा करण्यासाठी मानवाने प्रयत्न करणे. यातून माकड/ वानर चिडते व आक्रमण करते.

२.५ अन्य ठिकाणी उपद्रव होतो म्हणून तेथून माकड / वानर पकडून नव्या ठिकाणी सोडणे. नव्या ठिकाणी ते माकड / वानर समरस न होणे.

३.० अभ्यास क्षेत्र : सदर सर्वसामान्य परिस्थितीतील लागू होणारी कार्यपध्दती ठाणे, नाशिक आणि औरंगाबाद वनवृत्तातील समस्यांच्या उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेली आहे. या तीनही वन वृत्तात वानर / माकड - मानव संघर्षाची परिस्थिती उदभवणारी वन परिक्षेत्रे परिशिष्ट ९.६ दर्शविलेली आहेत.

४.० सर्वसाधारण उद्देश :

माकडांमुळे किंवा वानरांमुळे मानवांस उपद्रव होण्याची परिस्थिती हाताळण्यासाठी लेखी मार्गदर्शक सूचना जारी करण्यात येत आहेत, जेणेकरुन

४.१ माकड / वानराचे जिवास शक्यतो धोका पोहोचणार नाही.

४.२ मानवी जिवितास धोका पोहोचणार नाही.

४.३ वानर / माकडाची संघर्षमय स्थितीतून सुटका करण्यासाठी उचित तंत्राचा वापर होईल.

४.४ स्थानिक व्यक्ती व क्षेत्रीय कर्मचारी यांना सुस्पष्ट मार्गदर्शन मिळेल.

४.५ आणिबाणीची परिस्थिती हाताळण्याची तयारी सदैव राहण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन मिळेल.

४.६ माहिती संग्रह (डेटा बेस) तयार होईल.

५.० समस्यांचे वर्गीकरण



५.१ माकड किंवा वानर माणसांवर धावून येते, ओरबाडते किंवा चावा घेते.



५.२ माकड किंवा वानर माणसांच्या हातातील साहित्य हिसकावते, घरात घुसून अन्नपदार्थ - फळे आदि वस्तू पळविते.

माकड किंवा वानरांमुळे फळझाडांच्या किंवा पिकांच्या नुकसानीच्या घटनांची नोंद ठाणे, नाशिक आणि औरंगाबाद वनवृत्तात नाही. त्यामुळे ही बाब प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दतीत समाविष्ट नाही.

६.० ग्रामीण भागात माणसांवरील हल्ल्याची समस्या हाताळण्याची कार्यपध्दती :

माकड किंवा वानर पायी जाणाऱ्या किंवा उभ्या असलेल्या व्यक्तिच्या अंगावर धावून येते, ओरबाडते किंवा चावा घेते.

६.१ वार्ता कळताच संबंधीत कर्मचाऱ्यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी यांना कळवावे. माहिती मिळाल्यापासून २४ तासाच्या आंत वनपाल यांच्या नेतृत्वाखालील ५-६ कर्मचाऱ्यांच्या बचाव पथकाने बाधित क्षेत्रास स्वतः भेट द्यावी. समस्येचे स्वरुप तथा व्याप्ती जाणून घ्यावी. उपद्रवी वानर / माकड कोठे आहे हे शोधून काढावे. कर्मचाऱ्यांमार्फत किंवा निसर्गप्रमी अशासकीय व्यक्तींमार्फत त्याच्या



हालचालीवर सतत लक्ष ठेवावे.

६.२ त्या क्षेत्राशी संबंधित पोलिस निरिक्षक आणि तहसीलदार यांना कळवावे. गर्दी नियंत्रित करण्यासाठी पोलिसबळ मिळवावा.

६.३ बाधित क्षेत्रात ध्वनीवर्धकावरुन घोषणा करुन लोकांना सावध करावे. लोकांनी विशेषतः महिला आणि मुलांनी तेथे येवू नये असे आवाहन करावे. गावकऱ्यांना शांतता राखण्याचे आवाहन करावे.

६.४ बचाव पथकाने वानर/ माकडाच्या वर्तनाचे निरिक्षण करावे. या विषयातील जाणकार अशासकीय व्यक्ती आणि संस्था यांना शक्यतो सहभागी करुन घ्यावे. वानर / माकडांस न पकडता समस्या सुटणे शक्य आहे का ते पडताळावे. अनेकदा पावसाळ्यात नर वानर आक्रमक होण्याच्या घटना निदर्शनास येतात. सामान्यतः ही स्थिती ३ ते ७ दिवसापर्यंत राहते. त्यानंतर वानराचे वर्तन सामान्य होते.

६.५ लोकांचा जमाव आणि गोंगाट कमी झाल्यावर वानर / माकडाच्या वर्तनातील आक्रमकता कमी होत असल्याचे निरिक्षणात दिसून आल्यास वानर / माकडास स्वाभाविकपणे शांत होण्याची सुमारे १२ तास संधी द्यावी. किमान तीन दिवस पर्यंत जाणकार अशासकीय व्यक्ती आणि संस्था यांच्यामार्फत लक्ष ठेवावे. जर १२ तासाची संधी देणे धोक्याचे आहे असे बचाव पथक प्रमुखांस वाटले तर यापुढे दिल्याप्रमाणे पुढील कार्यवाही सुरु करावी.


६.६. वानर/ माकडाच्या वर्तनातील आक्रमकता स्वाभाविकपणे शांत होण्याची शक्यता नाही असे बचाव पथकास दिसून आल्यास वानर / माकडास पकडण्याबाबत

पथक प्रमुखाने निर्णय घ्यावा. प्राण्यास पकडण्याची मोहिम किमान पथक प्रमुख वनपालांच्या निगराणीखाली पार पाडावी. आवश्यकतेनुसार शीघ्र कृती दलास पाचारण करावे.

६. ७ नियोजन कार्यवाहीबद्दल उपस्थित पोलिसबल पथक प्रमुखास माहिती द्यावी आणि या मोहिमेदरम्यान बघ्यांची गर्दी दूर करण्याची व्यवस्था करावी.

६. ८ वानर / माकडास पकडण्याचा निर्णय झाल्यास पध्दती ठरवावी. माकड / वानरांस पुढील तीन पध्दतीद्वारे पकडता येईल. बेशुध्द करणे, पिंजऱ्यात पकडणे, टेसर गनचा वापर करणे.

६.८.१ बेशुध्द करणे :



घरात दडलेल्या तथा दाट लोकवस्तीच्या परिसरात शक्यतो माकड / वानरांस बेशुध्द करुन ताब्यात घ्यावे. झाड कमी उंचीचे असेल, खाली जाळी धरुन ठेवता येण्यासारखे असेल तर झाडावरील माकड / वानरासुध्दा बेशुध्द करण्याचा विचार करावा.

६.८.२ बेशुध्द करण्यासाठी पथक प्रमुखाने किमान वनपरिक्षेत्र अधिकारी यांचा मौखिक आदेश घ्यावा. या आदेशात या निर्णयाची पार्श्वभूमी आणि कारणमिमांसा असावी.

६.८.३ वन्यप्राण्यांना बेशुध्द करण्याची पध्दत वन विभागात रुढ झालेली आहे. त्या अंतर्गत विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब शीघ्र कृती दलाने करावा.



६.८.४ सद्हेतूने केलेल्या या प्रक्रियेत यदाकदाचित माकड / वानराचा मृत्यू झाला तर संबंधित कर्मचारी जिम्मेदार राहणार नाही.

६.९. पिंजऱ्यात पकडणे :



मोकळ्या जागी, उंच झाडे असलेल्या जागी माकड / वानरांस खाद्यपदार्थाचे आमिष दाखवून पिंजऱ्यात पकडता येईल. याबाबत खालील पध्दतीचा वापर करावा.



६.९.१ माकड / वानर पकडण्याचा निर्णय झाल्यास अनुभवी व्यक्ती, साहित्य वाहने यांची जुळवाजुळव करावी.

६.९.२ वन विभागाने अनुसूचित केलेल्या अनुभवी व्यक्तीमार्फत वानरास पिंजऱ्यात पकडण्याचे प्रयत्न सुरु करावे. माकड / वानरांस पकडणाऱ्या व्यक्तीची माहिती परिशिष्ट ९.५ मध्ये दिली आहे. त्या प्रयत्नांचा जराही सुगावा उपद्रवी माकडास / वानरास लागणार नाही याची खबरदारी घ्यावी. माकडे / वानरे फार चाणाक्ष असल्याने, मोहिमेदरम्यान त्यांच्याकडे निरखून पाहणे, हातवारे दाखविणे आदि गोष्टी टाळाव्या. उपद्रवी प्राण्यावर त्याच्या नकळतच लक्ष ठेवावे जेणेकरुन त्याला शंका येणार नाही व तो बेसावध राहील. पिंजरे तयार ठेवावेत.

६.९.३ परिसरात इतर कोणीही माकडांना / वानरांना खायला घालू नये यासाठी आवाहन करावे.



६.९.४ माकड / वानर पकडणाऱ्या व्यक्तीने त्या प्राण्याला शंका येणार नाही अशा बेताने खाद्यवस्तू हाताळाव्या आणि स्वतः खाव्या. खाताना मुद्दाम जमिनीवरही पडू द्याव्या आणि उचलून घ्यावा. या क्रिया वानरांना / माकडांना दिसाव्या. परंतू त्या व्यक्तीने यादरम्यान वानर / माकडांकडे अजिबात पाहू नये.



६.९.५. नंतर त्या व्यक्तीने खाद्यवस्तू पिंजऱ्याजवळ तसेच पिंजऱ्यातही सहजपणे ठेवाव्या आणि अगदी स्वाभाविकरित्या पिंजऱ्यापासून दूर जावे. माकडांना फळांची आणि वानरांना शेंगदाणे, भुईमूग शेंगाची भुरळ पडत असल्याने यासारख्या खाद्यवस्तुंचा वापर करावा.

६.९.६ उपद्रवी माकड / वानर पिंजऱ्यात येताच पिंजऱ्याचे दार बंद होईल अशी व्यवस्था करावी.

६.९.७ बंदिस्त झालेल्या माकडाचा / वानरांचा पिंजरा तातडीने हलवून माणसांच्या संपर्कापासून दूर सुरक्षित ठिकाणी ठेवावा.


६.९.८ पशुवैद्यकिय अधिकाऱ्यांकडून त्या माकडाची / वानराची तपासणी करुन घावी आणि त्याच्या आक्रमक वर्तनाचे कारण शोधण्याचा प्रयत्न करावा. गरजेप्रमाणे औषधोपचार करावा.



६.९.९ प्रश्नाधिन प्राण्यांच्या शारीरिक तथा मानसिक स्वास्थाविषयी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना शंका नसल्यास त्यांच्या देखरेखीत लवकरात लवकर त्या प्राण्यास, शक्यतो त्याच्या मूळ अधिवासात किंवा लगत मुक्त करण्यात यावे. मुक्त करताना त्याच्या शरिरावर ओळखीच्या दृष्टीने एखादी रंगाची खूण करण्यात यावी जेणेकरुन नंतर काही काळ त्याच्या वर्तनावर नजर ठेवणे सुलभ होईल.

६.९.१० पकडून मुक्त केलेल्या माकडाचे/वानराचे वर्तन कसे आहे याचा अभ्यास स्थानिक निसर्गप्रमी व्यक्ती, अशासकीय संस्था यांच्यामार्फत किमान दोन आठवड्यांपर्यंत करण्यात यावा.

६.१० टेसर गन चा वापर :



टेसर गन चा वापर फारसा रुढ झालेला नाही तथापि त्याचा विचार करावा. हे शस्त्र प्राणघातक नाही. या शस्त्राचा वापर करुन आक्रमक प्राण्यास अल्पकाळ शक्तीहीन केले जाते. त्या अवस्थेत त्याला पकडणे सुलभ होते.



६.१०.१ टेसरद्वारे शक्तीहीन करण्यासाठी पथक प्रमुखाने किमान वनपरिक्षेत्र अधिकारी यांचा लेखी आदेश घ्यावा. या आदेशात या निर्णयाची पार्श्वभूमी आणि कारणमिमांसा असावी.

६. ११ भविष्यात उपद्रव उदभवू नये यासाठी परिसरात जाणिव जागृतीचे उपक्रम सुरु ठेवावे. जाणिव जागृतीच्या उपक्रमांची

रुपरेषा परिशिष्ट क्रमांक ९. ३ येथे दिलेली आहे.

६.१२ परिसरातील शासकीय रुग्णालयात रेबिजच्या इंजेक्शनचा पुरेसा साठा राहील याबाबत दक्षता घेण्यास रुग्णालय प्रमुखांना आवाहन करण्यात यावे.

६.१३ वानर / माकडाने ओरबाडलेल्या / चावा घेतलेल्या व्यक्तीवर रुग्णालयात उपचार करण्यात यावा.

६.१४ केलेल्या कार्यवाहीचा अभिलेख संबंधीत प्रादेशिक वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी ठेवावा. त्याचा तपशील परिशिष्ट ९. ४ मध्ये दिलेला आहे. सहाय्यक वनसंरक्षक यांनी त्याचा नियमितपणे आढावा घ्यावा.

७.० ग्रामीण भागात खाद्य पदार्थ पळविणे / ओरबाडणे - माकड किंवा वानर माणसांच्या हातातील साहित्य हिसकावते, घरात घुसून अन्नपदार्थ फळे आदि वस्तू पळविते.

७.१ असे माकड / वानर सहसा हिंसक नसते. त्यास आयते खाण्याची सवय लागलेली असते. माणसांवर हल्ला करण्याचा, इजा करण्याचा त्याचा हेतू नसतो. त्यामुळे त्यास पकडण्यात येणार नाही. परिसरातील व्यक्तिंना खबरदारी घेण्यास सांगावे.

७.२ जर माकड / वानरांचे वर्तन आक्रमक झाले असल्याचे बचाव पथक प्रमुखाचे मत झाले तर अ.क्र. ६.१ ते ६.१४ मध्ये नमुद केलेल्या कार्यपध्दती अमलात आणण्याचा निर्णय घ्यावा.


८. ० नगरपालिका, महानगर पालिका क्षेत्रातील समस्या :

नगरपालिका, महानगर पालिका क्षेत्रात उपरोक्त अनुक्रमांक ६ आणि ७ मध्ये



नमूद केलेल्या समस्या उद्भवल्यास त्या समस्या सोडविण्याची प्राथमिक जबाबदारी संबंधित नगरपालिका, महानगरपालिका प्रशासकाची राहील. आवश्यक मनुष्यबळ आणि साहित्यसामग्री त्यांनी पुरवावी. तांत्रिक मार्गदर्शन संबंधित वनपरिक्षेत अधिकारी (प्रादेशिक) हे पुरवितील. पोलिस आणि महसूल यंत्रणेला कळविणे, कायदा व सुव्यवस्था पाळणे, गर्दी आवरणे, पशुवैद्यकीय अधिकाऱ्याची सेवा घेणे आदि कार्यवाही सुध्दा नगर / महानगरपालिकेची राहील. कार्यवाहीची पध्दती अ.क्र. ६.१ ते ६.१४ प्रमाणे राहील.

माकड / वानर पकडतांना / मुक्त करतांना नगरपालिका / महानगरपालिका प्रशासनाने संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे) यांना पूर्वकल्पना द्यावी तथा कार्यवाहीचा अहवाल पाठवावा. महानगरपालिका हद्दीतील माकडांच्या उपद्रवाबाबत मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने दि. २२ फेब्रुवारी २०१२ रोजी दिलेल्या निकालाची प्रत मार्गदर्शनार्थ परिशिष्ट ९.७ मध्ये दिलेली आहे.



परिशिष्ट ९.१ :

आवश्यक मनुष्यबळ

प्रत्येक विभागात किमान वनपरिक्षेत्र अधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वात एकूण ६ जणांचा एक शीघ्र कृतीदल राहील. १ वनपाल, २ वनरक्षक आणि २ वनमजूरही या कृतीदलात असतील. स्थानिक बचाव पथक प्रमुखाने विनंती केल्यावरुन सर्वच वन्य प्राण्यांच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या प्रसंगांना सामोरे जाण्याची प्रमुख जबाबदारी या शीघ्र कृतीदलाची राहील. या कृतीदलाकडे एक वाहन राहील. या कृतीदलास वन्यजीव विषयक आकस्मिकता हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात येईल. त्याचप्रमाणे दर महिन्याला नियमित सराव घेण्यात येईल. माकडे / वानरे पकडण्याचा दीर्घ अनुभव असलेल्या तज्ञ व्यक्तीमार्फत दर महिन्याला नियमित सराव घेण्यात येईल.

आवश्यक वाहने

अनेक वन विभागांनी बचाव कार्यासाठी वाहने तयार केलेली आहेत. त्याआधारे शीघ्र कृतीदलाकडे किमान एक रेस्क्यू व्हॅन राहील. याशिवाय पिकअप व्हॅन प्रकारातील वाहन तसेच पिंजऱ्यांची ने आण करण्यासाठी जेथे मालवाहू ट्रक सहजपणे भाड्याने मिळू शकत नाही तेथे लहान मालवाहू ट्रक यांचा समावेश राहील. याचा निर्णय स्थानिक परिस्थितीनुसार घेण्यात यावा.

तात्पुरता विश्रांतीतळ

पकडण्यात आलेल्या माकड/ वानरांची सविस्तर वैद्यकीय तपासणी करणे, प्रक्षुब्ध प्राण्यास शांत करणे त्याच्या वर्तनाचे जवळून निरिक्षण करणे याकरिता पिंजऱ्यासहीत प्राण्याला तात्पुरते ठेवण्यासाठी एक विश्रांतीस्थळ उभारण्यात यावे. हे विश्रांतीस्थळ मानवी गर्दी, कोलाहल, संपर्कातून दूर निसर्ग सानिध्यात रहावे. ऊन पावसापासून संरक्षणार्थ तेथे शेड उभारावे. पशुवैद्यकाची सेवा तेथे सहजतेने उपलब्ध होईल असे ठिकाण असावे.



परिशिष्ट ९.२ :

आवश्यक पिंजरे व साहित्य

पिंजरे : माकड / वानर पकडणाऱ्या व्यक्ती त्यांनी स्वतःच विकसीत केलेले वेगवेगळ्या प्रकारचे पिंजरे वापरतात असे दिसून आलेले आहे. पिंजऱ्याचे आकारमान आणि जडणघडण, डिझाईन याचा तपशील तज्ञ/ अनुभवी व्यक्तीच्या सल्याने संबंधित उपवनसंरक्षकांनी निश्चित करावा आणि पिंजरे बनवून घ्यावेत. पिंजरे शक्यतो फायबर ग्लासचे बंदिस्त असावेत. सध्या वापरात येणाऱ्या पिंजऱ्यांबाबतचा तपशील त्यांचा वापर याची माहिती खाली दिलेली आहे.



माकड /वानर पकडण्यासाठी सध्या वापरात येणारे पिंजरे :

क) पिंजऱ्यांचे प्रकार व रचना

१) माकड / वानर पकडण्याचा पिंजरा : सध्या माकड / वानर पकडणाऱ्या व्यक्ती स्वतः बनविलेले पिंजरे वापरतात. त्याचे वर्णन खाली देण्यात येत आहे. गरजेप्रमाणे त्याचा आकार, मटेरियल, डिझाईन यात बदल करता येईल.

पिंजरा दोन कप्यांचा असतो. त्याला तळाशी फळी नसते. त्याच्या सर्व बाजू जाळीच्या असून सुट्या करता येतात. पिंजरा उभारताना प्रत्येक बाजू एकमेकांना कोपऱ्यांवर तारेने बांधून पिंजरा तयार केला जातो. पिंजऱ्याचे सुटे भाग खालील

प्रमाणे असतात.

✪ दोन उभ्या बाजू आणि छताची बाजू एकूण नग ३. हा प्रत्येक नग जाळीचा साधारणतः प्रत्येकी ४ फूट बाय ३ फूट आकाराचा असतो. हया तीनही बाजू पूर्णपणे बंद असतात. त्यांना दरवाजे नसतात.



✪ टोकाच्या दोन आडव्या बाजू एकूण नग २. याचा आकार प्रत्येकी ३ फुट बाय ३ फुट असतो. या बाजुंना खालच्या अर्ध्या बाजूला २ फुट बाय १ फुट आकाराचा दरवाजा ठेवलेला असतो. हा दरवाजा उघडबंद करण्यासाठी वर खाली सरकणारी जाळी असते. या जाळीला वर उचलण्यासाठी वरच्या भागात हूक लावून दोरी बांधली जाते. ही दोरी पिंजऱ्याच्या छतावर असलेल्या एका पुलीवरुन मागे दूरवर नेली जाते. एक व्यक्ती या दोरीच्या सहाय्याने दरवाजा उघड बंद करु शकते.

✪ मधली एक आडव बाजू नग १. याचा आकार आणि रचना टोकाच्या बाजूंप्रमाणेच असते. याचा उपयोग पिंजऱ्याचे दोन कप्पे करण्यासाठी होतो. पहिल्या कप्प्यात आलेले माकड / वानर दुसऱ्या कप्प्यात घेण्यासाठी या मधल्या बाजूचा उपयोग होतो. याचाही दरवाजा दोरीच्या सहाय्याने उघड बंद करता येतो.

✪ काम झाल्यावर पिंजऱ्याच्या सर्व बाजू सुट्या केल्या जातात.

२. **वाहतुकीचे पिंजरे** : हे पिंजरे वेगवेगळ्या आकाराचे असतात. पकडण्याच्या पिंजऱ्यातून प्राण्यास या पिंजऱ्यात हलविले जाते. एक ते पाच माकड / वानरांसाठी ३ फुट उंच, ३ फुट रुंद आणि ३ ते ४ फुट लांब असा पिंजरा असावा. अनेक पिंजरे असल्यास अधिक माकडे / वानरे सामावून घेता येतील. पिंजरे वजनाने



हलके असल्यास हाताळणे सोपे राहील. सध्या वानर / माकड पकडणाऱ्यांकडील पिंजरे लोखंडी पट्ट्यांचे / सळयांचे वेल्डिंग केलेले असल्याने फार वजनदार असतात.

ख) पिंजऱ्यांचा वापर : वर वर्णन केल्याप्रमाणे सुटे भाग तारेने बांधून दोन कप्प्यांचा एक पिंजरा वानर / माकड पकडण्यासाठी तयार केला जातो. त्याच्या एका बाजूचा दरवाजा दुरुनच दोरीच्या सहाय्याने उघडा ठेऊन आंत खाद्यपदार्थ ठेवले जातात. सहसा उपद्रवी माकड / वानर पुढारी असते. ते धीट असल्याने सर्वप्रथम दरवाज्याच्या आंत शिरुन खाणे सुरु करते त्याचवेळी दोरीच्या सहाय्याने दरवाजा बंद केला जातो. या माकड / वानरास काठीचा धाक दाखवून मागच्या कप्प्यात घेतले जाते. पुढचा कप्पा गरजेनुसार पुन्हा वापरला जातो. पुढाऱ्याच्या पाठोपाठ इतरही माकडे / वानरे आंत येतात. गरज असेल तरच त्यांना बंदिस्त करण्यात येते.


अशा रितीने पिंजऱ्याच्या मागच्या कप्प्यात पकडून ठेवलेल्या माकड / वानरांना वाहतूकीच्या पिंजऱ्यात घेतले जाते. त्यासाठी दोन पिंजऱ्यांचे दरवाजे समोरासमोर ठेवून उघडले जातात. काठीचा धाक दाखवून माकड / वानरांस वाहतुकीच्या पिंजऱ्यात येण्यास भाग पाडले जाते. त्यानंतर वाहतुकीचा पिंजरा उचलून / ढकलून वाहनात ठेवण्यात येतो.

साहित्य : हे साहित्य सूचक असून त्यात स्थानिक गरजेनुसार सुधारणा करीत रहावे.



१) स्थायी साहित्य :

अ) दोरीच्या जाळ्या. आकार स्थानिकरित्या ठरवावा. टेसर गनचा वापर झाल्यास गरजेनुसार माकडांस / वानरांस जाळीत पकडण्याची तयारी राहील.



ब) दोरखंड प्रत्येक १०० मीटर लांबीचे ५ नग गर्दीला दूर करताना कामी येईल.

क) मेगाफोन : गर्दीला संबोधीत करणे, सूचना देणे यासाठी वापरण्यात येईल.



ड) प्रथमोपचार साहित्य : आकस्मिक झालेल्या जखमांवर तातडीच्या उपचारासाठी आवश्यक त्या औषधांसह / साहित्यांसह प्रथमोपचार पेटी राहील.



२. तत्कालीन महत्वाचे साहित्य :

वानर माकडांना आकर्षित करुन घेणारी फळे, चणेफुटाणे, शेंगदाणे इत्यादी खाद्यपदार्थ.



परिशिष्ट ९.३ :

जाणिव जागृतीच्या उपक्रमांची रुपरेषा

१) वानर / माकडाच्या वर्तनाबाबत शास्त्रोक्त माहिती सुलभ भाषेत द्यावी आणि माणसांनी त्या माकड / वानरांना आयते खायला घातल्यामुळे त्याची नैसर्गिक प्रेरणा / सवय बिघडते आणि कालांतराने ते आग्रही आणि आक्रमक होतात याची जाणीव परिसरातील लोकांना करुन द्यावी. वानरांना / माकडांना कोणीही आयते खायला घालू नये यासाठी विविध माध्यमांद्वारे जागृती करावी.

२) लोकांनी घराबाहेर खाद्यपदार्थांची ने आण बंद पिशव्यांतून करावी.

३) घराची दारे उघडी टाकू नये याची सूचना सातत्याने करावी.

४) खिडक्यांना जाळ्या बसविण्याचे आवाहन करावे.

५) माकड / वानरांनी खाद्यपदार्थ हिसकावून घेतल्यास तो परत मिळविण्यासाठी त्याच्याशी झटापट करु नये यासाठी लोकांना आवाहन करावे.

६) जेथे वारंवार माकड / वानर-मानव संघर्ष उदभवतो तेथे नियमीतपणे गावकऱ्यांशी संपर्क ठेवावा. चर्चा आयोजीत कराव्या. पोस्टर्सद्वारे प्रतिबंधात्मक उपायांना प्रसिध्दी द्यावी. माहिती पुस्तिकांचे वितरण करावे. शक्य तेथे फिल्म शो आयोजीत करावेत.

७) हॉटेल्स, निवासी शाळा, मंगल कार्यालये यामधून उरलेले अन्न बाहेर उघड्यावर टाकले जाणार नाही याची खबरदारी घेण्यास सांगावे.

८) धार्मिक स्थळांच्या परिसरात वानर/ माकडांना प्रसाद किंवा कोणतेही खाद्यपदार्थ भाविकांनी देऊ नये यासाठी धार्मिक स्थळ व्यवस्थापकांच्या मदतीने जनजागृती करावी.



परिशिष्ट ९.४:

कार्यवाहीचा अभिलेख

अ) घटनांची नोंदवही :

यात प्रत्येक घटनेचा सविस्तर तपशील खाली दिलेल्या मुद्यावर द्यावा.

१) घटनेच्या ठिकाणाचे अक्षांश, रेखांश नोंद केलेला नकाशा

२) समस्या कधी व कशी उदभवली.

३) नेमकी प्रजाती, संख्या व ठिकाण.

४) उपद्रवाचे स्वरुप

५) केलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर दैनंदिन नोंदी

६) पकडल्यानंतर त्या प्राण्याची अवस्था

७) पशुवैद्यकीय तज्ञाचे अभिप्राय

८) मुक्त करण्याचा दिनांक आणि वेळ, ठिकाण

९) नव्या ठिकाणी त्या प्राण्याचे वर्तन

१०) जखमी व्यक्तीची नांवे

११) जखमांचे स्वरुप

१२) केलेले उपचार इत्यादी

आवश्यक वाटल्यास इतरही अनुषंगिक माहिती ठेवता येईल.

प्रश्नाधीन वानर / माकडाचे वर्तन आक्रमक का झाले असावे याचा (कारणांचा) शोध घ्यावा आणि नोंद ठेवावी. तसेच घडलेली घटना हाताळण्याच्या कार्यपध्दतीचे व्हिडिओ चित्रिकरण करुन लायब्ररीत सुरक्षीत ठेवावे.

ब) जनजागृती मोहिम नोंदवही :

जेथे माकड वानर संघर्षाच्या घटना वरचेवर उद्भवतात तेथे केलेल्या जनजागृती मोहिमच्या नोंदी वनपरिक्षेत्र स्थरावर ठेवण्यात याव्या. गांवफेरी, गांवकऱ्यांशी चर्चा, पोस्टर्स प्रसिध्दी, पुस्तिका वितरण, बॅनर्स भित्तीचित्रे फिल्म शो इत्यादीद्वारे केलेल्या कार्यवाहीच्या दैनंदिन नोंदी यात असाव्या.

परिशिष्ट ९.५

वानर / माकडांस पिंजऱ्यात पकडण्याचा अनुभव असलेल्या व्यक्ती

ही नांवे सध्या उपलब्ध असलेल्या माहितीवरुन देण्यात येत आहेत. यात फरक पडू शकतो.

	नाव	पत्ता	संपर्क क्र. ई मेल
१	श्री. समाधान सोमनाथ गिरी	रा. अंभई, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद	9423451826/9960008254 krushnagiri46@gmail.com
२	श्री. संदीप सोमनाथ गिरी	रा. अंभई, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद	9960008334 krushnagiri46@gmail.com
३	श्री. कृष्णा सोमनाथ गिरी	रा. अंभई, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद	8390535393 krushnagiri46@gmail.com
४	श्री. हकीम शेख	रा. चेंबूर , मुंबई	9867836935
५	श्री. शंकर	रा. मुंबई	9702398488





परिशिष्ट ९.६

संघर्षाची परिस्थिती उदभवणारी वन परिक्षेत्रे

वनवृत्त		वनविभाग	संघर्षप्रवण वनपरिक्षेत्रे
१	नाशिक	नाशिक (पश्चिम)	नाशिक
		नाशिक (पूर्व)	चांदवड, येवला, कळवण, नांदगांव
२	ठाणे	ठाणे	ठाणे, मुंबई, कल्याण
३	औरंगाबाद	औरंगाबाद	सिल्लोड, वैजापूर, कन्नड, अजिंठा, खुलताबाद, जालना (उत्तर)
		नांदेड	नांदेड, मुदखेड, माहुर, भोकर, किनवट, देगलूर
		परभणी	परभणी
		बीड	पाटोदा, बीड
		हिंगोली	औंढा (पूर्व) व हिंगोली
		उस्मानाबाद	औसा



परिशिष्ट ९.७

मा. मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपिठाने दिनांक २२ फेब्रुवारी २०१२ रोजी दिलेल्या निकालाची प्रत.

FARAD CONTINUATION SHEET No ___.
IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
NAGPUR BENCH AT NAGPUR

PUBLIC INTEREST LITIGATION NO. 09 of 2010

BHARAT NAGAR NAGRIK MANDAL
VERSUS
NAGPUR MUNICIPAL CORPORATION AND ANOTHER

Office Notes, Office Memoranda of Coram, appearances, Court's orders of directions and Registrar's orders	Court's or Judge's orders

Mr. S. S. Sanyal, Advocate for the petitioner.
Mr. J. B. Kasat, Advocate for Respondent no.1
Mr. N. W. Sambre, Govt. Pleader for respondent no. 2.

CORAM : P.B.MAJMUDAR AND P.B. VARALE, JJ.
DATE : 22nd FEBRUARY, 2012.

Heard the learned counsel for the parties.

By way of this writ petition, the petitioner-Mandal has raised the point regarding catching and relocating the monkeys of two areas of Nagpur city namely Bharat Nagar and Ravi Nagar, which posed danger to the residents of these areas.

The learned Government Pleader today states before this Court that as per his instructions, till this date 44 monkeys have been captured by the Corporation and they have been sent to the nearby forest, which is located at a distance of 60 Kms near Ramtek tahsil.

Considering the statement made by the learned Government Pleader, it is clear that the authority has taken steps regarding capturing the monkeys and now they have been re-settled in the forest area, which is at a far distance from Nagpur city. In view of the same, since the authority is

Bombay High Court





